# महाराष्ट्राच्या इतिहासाचे समग्र लेखन व्हावे

## डॉ. सदानंद मोरे, क्रांतिवीर रंगरावदादा पाटील व्याख्यान

कोल्हापूर, ता. २६ : महाराष्ट्राच्या इतिहासाचे समग्र लेखन ही येत्या काळाची गरज असून, त्यादृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न झाले पाहिजेत, असे स्पष्ट मत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. येथील ताराराणी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.




**कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. सदानंद मोरे. सोबत इतर.**
**(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)**

डॉ. मोरे यांनी आजवरच्या एकूणच इतिहासाच्या लेखनाचा सर्वांगीण वेध घेतला. ते म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा वध केल्यानंतर शाहिराने लिहिलेला समकालीन पोवाडा हा खऱ्या अर्थाने मराठी इतिहास लेखनाचा पहिला प्रयत्न होता.'' त्याचवेळी संस्कृत काव्य आणि बखरीच्या माध्यमातूनही तो लिहिला जाऊ लागला. पुढे ग्रँड डफनी लिहिलेला मराठ्यांचा इतिहासच सर्व पातळीवर सर्वमान्य झाला. मात्र, त्यातही काही उणिवा असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यावर पुन्हा उलट-सुलट लेखन सुरू झाले. तेव्हापासून आजअखेर लेखनाचे अनेक प्रयत्न झाले. मात्र, त्यात समग्रतेचा अभाव आहे.''

मराठा समाज पहिल्यापासून राष्ट्रप्रेमाने भारलेला आणि प्रशासकीय पातळीवर सक्षम असणारा समाज आहे. दिल्लीवर जेंव्हा जेंव्हा परकियांना आक्रमण केले तेंव्हा मराठ्यांनीच त्यांना परतवून लावले. मात्र, त्यातील बहुतांश इतिहास हा अपूर्णच असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. एस. एन. पवार, अशोकराव पर्वते, प्राजक्त पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी स्वागत केले. शाहीर आझाद नायकवडी यांनी पोवाडा सादर केला. प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एस. डी. चव्हाण यांनी आभार मानले.

27/12/18 सकाळ